# मिरा भाईंदर महानगरपालिका

## "मा. विभागीय पदोन्नती निवड समिती" बैठक दि.31/03/2022 रोजीचे इतिवृत्तांत"

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-क) (वेतनश्रेणी S-13 35400-112400) या संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) (वेतनश्रेणी S-15 41800-132300) या संवर्गातील पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.31/03/2022 रोजी दुपारी 12.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्यालय, दुसरा मजला येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.

1. श्री. दिलीप ढोले — आयुक्त तथा अध्यक्ष,
2. श्री. मारुती गायकवाड — उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव,
3. श्रीम. मंजिरी डिमेलो — प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य,
4. श्री. दिपक खांबीत — कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी,

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिपक खाबीत)
कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी
विभागीय पदोन्नती निवड समिती

(मंजिरी डिमेलो)
प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा अध्यक्ष
विभागीय पदोन्नती निवड समिती

**<u>आस्थापना विभागाने सादर केलेला प्रस्ताव :-</u>**

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|
| अग्निशमन केंद्र अधिकारी (श्रेणी-2, अग्निशमन सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किमान 03 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गातील एकुण 08 पदे मंजूर आहेत व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार अग्निशमन केंद्र अधिकारी ची एकुण 08 पदे ही 100% पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्यामुळे 08 रिक्त असलेल्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचे प्रस्तावित आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.३(3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट -अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

# परिशिष्ट "अ"

| अ.क्र. | ज्येष्ठतेनुसार विचार क्षेत्रात येणाऱ्या अधिकाऱ्यांची जाती प्रवर्ग | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | जन्म दिनांक व सध्याचे वय | सेवानिवृत्ती चा दिनांक | शैक्षणिक अर्हता | सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त आहे/नाही | ज्या पदावरुन पुढील पदावर पदोन्नती देय आहे त्या पदावर एकुण सेवा किती व केव्हापासून | सध्याच्या पदावर जेव्हापासून सलग काम करीत आहे तो दिनांक (त्या पदाचे नाव द्यावे) पदोन्नतीचा मानीव दिनांक दिला असल्यास तो नमूद करावा | वयाच्या 50/55 व्या वर्षी झालेल्या पुनर्विलोकनाचा निर्णय | जातीचे प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली आहे किंवा कसे? | शिस्तभंग विषयक कार्यवाही/प्राथमिक चौकशी चालू आहे/नाही (विस्तृत माहिती जोडपत्र क मध्ये नमूद करावी) | पूर्वी कधीतरी आस्थापना मंडळाने त्यांचा विचार केला होता/नाही असल्यास आ.मं.च्या बैठकीचा दिनांक व सा.प्र.वि.चा संबंधीत पत्रव्यवहार नमूद करावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1. | एन.टी. | श्री. अल्पेश जगन्नाथ संखे | 1 | 04/09/1975 46 वर्ष | 30/09/2033 | बी.ए., स्टेशन ऑफिसर अॅन्ड इस्ट्रक्टर प्रशिक्षण | आहे | 03/07/2010 पासुन (11 वर्ष) | 03/07/2010 पासुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | लागु नाही | होय | जोडपत्र क सोबत जोडले आहे | दि.09/03/2022 रोजी मा. विभागीय पदोन्नती निवड समिती बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत न्यायालयीन प्रकरण असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विधी अधिकारी यांचेकडुन अभिप्राय घेऊन पुढील |
| 2. | खुला | श्री. धनंजय वसंत कनोजे | 2 | 22/07/1983 38 वर्ष | 31/07/2041 | बी.ए., स्टेशन ऑफिसर अॅन्ड इस्ट्रक्टर प्रशिक्षण | आहे | 13/07/2010 पासुन (11 वर्ष) | 13/07/2010 पासुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | लागु नाही | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 3. | एस.सी | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल | 3 | 05/09/1968 53 वर्ष | 30/09/2026 | बी.ए., सब स्टेशन ऑफिसर प्रशिक्षण | आहे | 16/10/2010 पासुन (11 वर्ष) | 16/10/2010 पासुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | होय | नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 4. | खुला | श्री. दिलीप रणवरे | 4 | 01/06/1966 55 वर्ष | 31/05/2024 | बी.ए. | आहे | 16/10/2010 पासुन (11 वर्ष) | 16/10/2010 पासुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | होय | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5. | खुला | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील | 5 | 20/04/1970 51 वर्ष | 30/04/2028 | एस.एस.सी, स्टेशन ऑफिसर अॅन्ड इस्ट्रक्टर प्रशिक्षण, प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम क्र.10, ऑपरेशन अॅण्ड मेंटनन्स फॉर टर्नटेबल लॅडर एल 39 प्रशिक्षण ऑस्ट्रिया (युरोप) | आहे | 16/10/2010 पासुन (11 वर्ष) | 16/10/2010 पासुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | होय | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | विभागीय पदोन्नती निवड समितीसमोर प्रस्ताव सादर करावा. |
| 6. | खुला | श्री. प्रकाश शंकर बोराडे | 6 | 01/06/1969 52 वर्ष | 31/05/2027 | बी.कॉम, सॅनिटरी इन्पेक्टर डिप्लोमा, इंग्रजी व मराठी टंकलेखक 40 श.प्र.मि., हिंदी टंकलेखक 30 श.प्र.मि, राज्य अग्निशमन प्रशिक्षण अभ्यासक्रम, फायर इंजिनिअरींग ग्रॅज्युएटशीप (फायर) (IFE-India) एम आर फायर इंजिनिअरींग परीक्षा (IFE-UK) | आहे | 16/10/2010 पासुन (11 वर्ष) | 16/10/2010 पासुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | होय | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7. | खुला | श्री. डॉसन आबेल ढोल्या | 8 | 30/05/1979 42 वर्षे | 31/05/2037 | बी.ए., स्टेशन ऑफिसर अॅन्ड इस्ट्रक्टर प्रशिक्षण | आहे | 04/06/2011 पासुन (10 वर्ष) | 04/06/2011 पासुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | लागु नाही | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |
| 8. | इमाव | श्री. सदानंद विष्णू पाटील | 9 | 01/06/1976 45 वर्षे | 31/05/2034 | बी.ए. | आहे | 06/08/2011 पासुन (10 वर्ष) | 06/08/2011 पासुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | लागु नाही | होय | जोडपत्र क सोबत जोडले आहे | |

- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल, श्री. दिलीप रणवरे, श्री. जगदिश लक्ष्मण पाटील व श्री.प्रकाश शंकर बोराडे यांना मा.महासभा दि.10/10/2008, ठराव क्र.42 नुसार सब स्टेशन ऑफिसर पदाकरीता विहित करण्यात आलेली शैक्षणिक अर्हता व पात्रतेनुसार मा.विभागीय पदोन्नती निवड समिती दि.15/10/2010 मध्ये शिफारस केल्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणूकीसाठी अर्हता व सेवा भरती नियम, 2008 शासनाकडुन अंतिम होण्याच्या अधिन राहून सब स्टेशन ऑफिसर या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली आहे.

परंतु महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, यांचेकडील दि.10/06/2019 रोजीच्या अधिसुचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंमलात असलेले सध्याचे सर्व सेवा प्रवेश नियम व महानगरपालिकेचे शासन मान्य मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम-2014 तसेच तत्संबंधात यापुर्वी करण्यात आलेले ठराव व आदेश यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्र शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 विहित करण्यात आले आहे. व सदरचे सेवा प्रवेश नियम दि.10/06/2019 पासुन मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्यक्षात लागु झाले आहेत.

शासनाने यापुर्वीचे सर्व सेवा प्रवेश नियम, आदेश व ठराव यांचे अधिक्रमण केलेले आहे. त्यामुळे श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल, श्री. दिलीप रणवरे, श्री. जगदिश लक्ष्मण पाटील व श्री.प्रकाश शंकर बोराडे यांना मा.महासभा दि.10/10/2008, ठराव क्र.42 मध्ये विहित केलेल्या शैक्षणिक पात्रता व

अर्हतेनुसार सब स्टेशन ऑफिसर या पदावर दिलेली तात्पुरती पदोन्नती कायम करण्याची आवश्यकता नाही असे इकडील विभागाचे मत असुन याबाबत शासन मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती देणेस शिफारस आहे.

➢ विचारक्षेत्रातील खालील मागासवर्गी अधिकारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.अल्पेश जगन्नाथ संखे |
| 2. | श्री. सदानंद विष्णु पाटील |

➢ विचारक्षेत्रातील खालील मागासवर्गी अधिकारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल |

➢ विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांपैकी खालील अधिकारी यांचे वयाच्या 50/55 व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल |
| 2. | श्री. दिलीप रणवरे |
| 3. | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील |
| 4. | श्री. प्रकाश शंकर बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. अल्पेश जगन्नाथ संखे |
| 2. | श्री. धनंजय वसंत कनोजे |
| 3. | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल |
| 4. | श्री. दिलीप रणवरे |
| 5. | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील |
| 6. | श्री. प्रकाश शंकर बोराडे |

| | |
|---|---|
| 7. | श्री. डॉसन आबेल ढोल्या |
| 8. | श्री. सदानंद विष्णू पाटील |

- विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे लागु नाही.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. अल्पेश जगन्नाथ संखे |
| 2. | श्री. धनंजय वसंत कनोजे |
| 3. | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल |
| 4. | श्री. दिलीप रणवरे |
| 5. | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील |
| 6. | श्री. प्रकाश शंकर बोराडे |
| 7. | श्री. डॉसन आबेल ढोल्या |
| 8. | श्री. सदानंद विष्णू पाटील |

- विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांचा परिविक्षाधीन कालावधीकरीता नेमणूक करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याची आवश्यकता नाही.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. दिलीप रणवरे |
| 2. | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील |

- विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यात आला आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय वसंत कनोजे |
| 2. | श्री. प्रकाश शंकर बोराडे |

- विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांचेबाबत मा. औद्योगिक न्यायालयाने, ठाणे यांच्या दि.14/01/2020 रोजी महानगरपालिकेने दिलेली दि.21/09/2011 रोजीच्या नोटीसीवर निर्णय घेणेस आदेशित केलेले आहे. त्यामुळे दि.09/12/2012 रोजी दिलेले बडतर्फी आदेश अद्यापपर्यंत रद्द झालेले नाहीत. सदर प्रकरणी

मा. न्यायालयाच्या पारित होणाऱ्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेणे योग्य असल्यामुळे त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यात आलेला नाही.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. अल्पेश जगन्नाथ संखे |
| 2. | श्री. डॉसन आबेल ढोल्या |
| 3. | श्री. सदानंद विष्णू पाटील |

➢ विचारक्षेत्रातील कार्यरत असलेल्या खालील अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची चौकशी सुरु नाही.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.अल्पेश जगन्नाथ संखे |
| 2. | श्री. धनंजय वसंत कनोजे |
| 3. | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल |
| 4. | श्री. दिलीप रणवरे |
| 5. | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील |
| 6. | श्री. प्रकाश शंकर बोराडे |
| 7. | श्री. डॉसन आबेल ढोल्या |
| 8. | श्री. सदानंद विष्णू पाटील |

➢ विचारक्षेत्रातील खालील अधिकारी हे दिव्यांग अधिकारी नाहीत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री.अल्पेश जगन्नाथ संखे |
| 2. | श्री. धनंजय वसंत कनोजे |
| 3. | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल |
| 4. | श्री. दिलीप रणवरे |
| 5. | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील |

| | |
|---|---|
| 6. | श्री. प्रकाश शंकर बोराडे |
| 7. | श्री. डॉसन आबेल ढोल्या |
| 8. | श्री. सदानंद विष्णू पाटील |

➢ विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांना जा.क्र.मनपा/आस्था/3760/2021-22, दि.29/03/2022 अन्वये स्थायित्व प्रमाणपत्र दिलेले आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. धनंजय वसंत कनोजे |
| 2. | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल |
| 3. | श्री. दिलीप रणवरे |
| 4. | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील |
| 5. | श्री. प्रकाश शंकर बोराडे |

➢ विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांचेबाबत मा. औद्योगिक न्यायालयाने, ठाणे यांच्या दि.14/01/2020 रोजी महानगरपालिकेने दिलेली दि.21/09/2011 रोजीच्या नोटीसीवर निर्णय घेणेस आदेशित केलेले आहे. त्यामुळे दि.09/12/2012 रोजी दिलेले बडतर्फी आदेश अद्यापपर्यंत रद्द झालेले नाहीत. सदर प्रकरणी मा. न्यायालयाच्या पारित होणाऱ्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेणे योग्य असल्यामुळे त्यांना स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | श्री. अल्पेश जगन्नाथ संखे |
| 2. | श्री. डॉसन आबेल ढोल्या |
| 3. | श्री. सदानंद विष्णू पाटील |

➢ विचारक्षेत्रातील अधिकारी यांना जा.क्र.मनपा/आस्था/1130/2021-22, दि.18/08/2021 व जा.क्र.मनपा/आस्था/1146/2021-22, दि.23/08/2021 तसेच जा.क्र.मनपा/आस्था/1162/2021-22, दि.24/08/2021 अन्वये मराठी एदर्थ मंडळाची भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

➢ विचारक्षेत्रातील अधिकारी यांना जा.क्र. मनपा/आस्था/1088/2021-22, दि.11/08/2021 तसेच जा.क्र. मनपा/आस्था/1089/2021-22, दि.11/08/2021 अन्वये हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणेमधुन सुट देण्यात आली आहे.

- नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. शासनाने मान्यता दिल्यानुसार जा.क्र.मनपा/आस्था/4112/2021-22, दि.15/02/2021 रोजीच्या आदेशान्वये उप अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाच्या पदनामात बदल करून सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी असा पदनामात बदल केला आहे.
- विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांची सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गाची सन 2020 च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार ज्येष्ठता क्रम खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 1. | 1 | श्री.अल्पेश जगन्नाथ संखे | - |
| 2. | 2 | श्री. धनंजय वसंत कनोजे | - |
| 3. | 3 | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल हे दि.25/05/2004 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नती मधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहे. त्यामुळे त्यांची सन 2004 ची लिडींग फायरमन या पदाची ज्येष्ठता पाहता निवडसूचीमध्ये त्यांचे नाव अ.क्र.03 वर दर्शविले आहे. |
| 4. | 4 | श्री. दिलीप रणवरे | श्री. दिलीप रणवरे हे दि.25/05/2004 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नती मधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहे. त्यामुळे त्यांची सन 2004 ची लिडींग फायरमन या पदाची ज्येष्ठता पाहता निवडसूचीमध्ये त्यांचे नाव अ.क्र.02 वर दर्शविले आहे. |
| 5. | 5 | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील हे त्यांची सन 2004 ची यंत्रचालक या पदाची ज्येष्ठता पाहता निवडसूचीमध्ये त्यांचे नाव अ.क्र.02 वर दर्शविले आहे. |
| 6. | 6 | श्री. प्रकाश शंकर बोराडे | - |
| 7. | 7 | श्री. डॉसन आबेल ढोल्या | - |
| 8. | 8 | श्री. सदानंद विष्णू पाटील | - |

- मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन सामान्य प्रशासन विभाग (का.16-ब), शासन निर्णय दि.07/05/2021 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्य न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन तात्पुरती पदोन्नती देण्यात यावी. असे निर्देश असल्याने सोबत जोडलेल्या लिडींग फायरमन व यंत्रचालक या संवर्गाची सन 2004 च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार निवडसुची खालीलप्रमाणे आहे.

**लिडींग फायरमन**

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | 2 | श्री. दिलीप रणवरे | - |
| 2. | 3 | श्री. छोटुलाल सुवाजी आदिवाल | - |

**यंत्रचालक**

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | 2 | श्री. जगदिश लक्ष्मण पाटील | - |

- विचारक्षेत्रातील खालील अधिकाऱ्यांपैकी श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 नुसार अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे.परंतू श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल यांना जा.क्र.मनपा/आस्था/824/2010-11, दि.16/10/2010 रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (सब स्टेशन ऑफिसर) या पदावर अनुसचित जाती या प्रवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. परंतू श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल यांनी अनुसूचित जाती या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले नाही. त्यामुळे श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देणेकरीता सद्यस्थितीत विचार करता येणार नाही.
- विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांपैकी श्री.अल्पेश जगन्नाथ संखे, श्री.सदानंद विष्णु पाटील व श्री.डॉसन आबेल ढोल्या यांची सब स्टेशन ऑफिसर या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. मात्र नेमणूकीच्या आदेशातील अटीनुसार पाठयक्रम उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे दि.20/09/2011 रोजी महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या नोटीसीविरुध्द श्री.अल्पेश जगन्नाथ संखे यांनी Complaint (ULP) 401/2011, श्री.सदानंद विष्णु पाटील यांनी Complaint (ULP) 402/2011 तसेच श्री.डॉसन आबेल ढोल्या यांनी Complaint (ULP) 403/2011 अन्वये मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे महानगरपालिकेविरुध्द तक्रारी दाखल केलेल्या आहेत.

सदर तक्रारींमधील तक्रारदार यांचा अंतरिम आदेश मिळणेकरीताचा अर्ज मा.औद्योगिक न्यायालयाने दि.09/08/2017 रोजी फेटाळण्यात आला असता सदर आदेशाविरुध्द त्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.11281,11300 व 11302/2017 अन्वये याचिका दाखल केल्या होत्या.

सदर याचिका दि.04/06/2018 रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे मा.न्यायाधिश श्री.एस.सी.गुप्ता यांचेकडे सुनावणीला आली असता सदर तीनही याचिकांमध्ये खालीलप्रमाणे मत नोंदवून एकत्रित आदेश पारित केले.

1. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत वरील नमुद अग्निशमन विभागातील पदांच्या भरतीच्या जाहिरातीमध्ये अग्निशमन विभागाशी संबंधीत प्रशिक्षण अभ्यासक्रम हा National Fire Service Collage, Nagpur येथुन पूर्ण करणे आवश्यक असल्याची अट नमुद करण्यात आलेली आहे. मात्र वरील नमुद उमेदवार यांनी अग्निशमन विभागाशी संबंधीत प्रशिक्षण अभ्यासक्रम हा National Fire Service Collage, Nagpur येथून न करता All India Institute Of Local Self Government वडोदरा व गुवाहाटी या संस्थेमार्फत पूर्ण केला असल्याचे प्रमाणपत्र त्यांनी भरती प्रक्रियेच्यावेळी सादर केली असता सदरची प्रमाणपत्रे ग्राहय धरुन तत्कालीन निवड समितीने सदर उमेदवारांची निवड केलेली आहे.
2. निवड झाल्यानंतर सदर उमेदवार शैक्षणिक व तांत्रिक अर्हता प्रमाणपत्रांच्या मुळ व छायांकित प्रती पडताळणीसाठी सादर करणेस आदेशित करुन सदर कागदपत्रांच्या पडताळणी अंती महानगरपालिकेमार्फत त्यांस नियुक्ती आदेश देखील देण्यात आलेले आहे.
3. तसेच सदर पदांच्या भरती करीता अग्निशमन विभागाशी संबंधीत प्रशिक्षण अभ्यासक्रम हा National Fire Service Collage, Nagpur येथून करणे आवश्यक असल्याची अट ज्या सेवाभरती नियमांच्या आधारे नमुद करण्यात आलेली होती, ते सेवा भरती नियम हे वरील पदांच्या भरतीच्या वेळी मंजूर नसल्याने भरती प्रक्रियेकरीता नेमण्यात आलेल्या निवड समितीस सदरची अट शिथिल करण्याबाबतचे अधिकार आहेत.
4. तसेच All India Institute Of Local Self Government वडोदरा व गुवाहाटी या संस्था मान्यता प्राप्त नसल्याचे अथवा अवैध असल्याचे महानगरपालिकेमार्फत सदर प्रकरणी कुठेही नमुद करण्यात आलेले नाही.

वरीलप्रमाणे मत मांडून मा.उच्च न्यायालयाने याचिकेदार यांच्या वरील याचिकामधील मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे यांचे Complaint (ULP) 401/2011, 402/2011 व 403/2011 मधील दि.09/08/2017 रोजीचे आदेश रद्द ठरविणेबाबतची Prayer Clauses (a) व (b) मान्य करुन सदरची याचिका ॲडमिट केली.

वरील याचिकांमधील Prayer Clauses (a) व (b) खालीलप्रमाणे.

(a) That this Hon,ble court may be pleased to issue a writ in the nature of certiorari or any other appropriate writ, order or direction as this Hon,ble Court may deem fit and proper calling for records and proceeding in Complaint (ULP) No.401/2011 pending before the industrial Court, Thane wherein the impugned order dated 09.08.2017 is passed and after verifying and ascertaining the legality and correctness thereof, to quash and set aside the same.

(b) Pending the hearing and final disposal of the petition, the operation and/or implementation of the impugned order dated 09.08.2017 passed by the Industrial court, Thane in Complaint (ULP) No 401/2011 may kindly be stayed.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या वरील आदेशाविरुध्द महानगरपालिकेच्यावतीने मा.सर्वोच्य न्यायालय, दिल्ली येथे SLP (c) 001887/2019, SLP (c) 001888/2019, SLP (c) 001889/2019 अन्वये याचिका दाखल करण्यात आल्या असता सदर याचिकांमधील दि.14/01/2019 रोजी झालेल्या एकत्रित सुनावणीमध्ये मा.सर्वोच्य न्यायालयातील मा.न्यायाधीश भानुमती व बॅनर्जी यांच्या खंडपीठाने सदर याचिका फेटाळल्या आहेत. तसेच सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे वरील नमुद आदेश कायम ठेवुन मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथील Complaint (ULP) No 401/2011, 402/2011 व 403/2011 या तक्रारी 01 वर्ष आतील कालावधीमध्ये निकाली काढण्यास आदेशित केले होते.

तद्नंतर मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दि.14/01/2020 रोजी निर्णय पारीत करुन संदर्भिय क्र.1 व 3 या तक्रारी अंशत: मान्य करुन तक्रारदार यांना दि.20/09/2011 रोजीच्या नोटिसीच्या अनुषंगाने दोन महिन्यांच्या आत खुलासा सादर करण्यास व खुलासा सादर केल्यानंतर 2 महिन्याच्या आत उचित निर्णय घेण्यास महानगरपालिकेस आदेशित केले आहे. सदर आदेशाचे अवलोकन केले असता सदर आदेशामध्ये महानगरपालिकेने श्री.अल्पेश जगन्नाथ संखे, श्री.सदानंद विष्णु पाटील व श्री.डॉसन आबेल ढोल्या यांस दि.21/09/2011 रोजीच्या नोटिसीच्या अनुषंगाने निर्णय पारीत केला असुन सदर नोटिसीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने सदर तिन्ही कर्मचारी यांस बडतर्फ करणेबाबतचे दि.09/12/2011 रोजीच्या आदेशाबाबत कोणतेही भाष्य केलेले नाहीत अथवा सदरचे आदेश रद्द केलेले नाहीत या संदर्भात महानगरपालिका अभियोक्ते ॲड.सतिश हेडगे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सदर बाब मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक असुन त्याकरीता Review अर्ज दाखल करणेबाबत अभिप्राय दिला आहे. त्याअनुषंगाने मा.आयुक्त यांच्या मंजुरीन्वये मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांच्या दि.14/01/2020 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्यावतीने Review अर्ज दाखल करणेकरीता मनपा अभियोक्ते यांना कळविले आहे. परंतु दरम्यानच्या काळात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे लॉक डाऊन असल्यामुळे मा. न्यायालयाचे कामकाज देखील बंद होते. तसेच मनपा अभियोक्ता यांना देखील कोरोनाचा प्रादुर्भाव झाला असल्यामुळे Review अर्ज दाखल होऊ शकलेला नसल्याचे मनपा अभियोक्ता यांनी कळविले आहे. सदर कर्मचारी यांना महानगरपालिकेने दिलेल्या दि.09/12/2011 रोजीचे आदेश मा. न्यायालयाने रद्द न करता मनपाने दि.21/09/2011 रोजीच्या नोटिसीवर निर्णय घेण्यास आदेशित केले आहे. सदर निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयात मनपामार्फत रिट याचिका दाखल करण्याबाबत अभिप्राय दिलेला आहे. सद्यस्थितीत सदर कर्मचारी यांना मनपाने दिलेली दि.21/09/2011 रोजीची नोटीस तसेच दि.09/12/2011 रोजी दिलेले बडतर्फीचे आदेश अद्यापपर्यंमत रद्द झालेले नाहीत. त्यामुळे सदर प्रकरणी मा. न्यायालयाच्या पारीत होणाऱ्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेणे योग्य होईल असे विधी विभागाने कळविले आहे.

त्यामुळे विधी अधिकारी यांनी कळविल्यानुसार श्री.अल्पेश जगन्नाथ संखे, श्री.सदानंद विष्णु पाटील व श्री.डॉसन आबेल ढोल्या यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देणेसाठी सद्यस्थितीत विचार करता येणार नाही.

- विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांपैकी श्री.जगदिश लक्ष्मण पाटील यांनी माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी) (मराठी विषयासह) निर्धारीत कालावधीत उत्तीर्ण करुन प्रमाणपत्र व गुणपत्रिका सादर न केल्यामुळे जा.क्र.मनपा/आस्था/1918/3354/2013-14, दि.01/03/2014 रोजीच्या आदेशान्वये सब स्टेशन या पदावरुन पदावनत करुन पदोन्नतीपुर्वी कार्यरत यंत्रचालक पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे. श्री.जगदिश लक्ष्मण पाटील यांनी पदावनत आदेशाविरुध्द मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे याचिका क्र.81/2014 अन्वये दावा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले असुन, सदर प्रकरणाबाबत मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे दि.21/03/2014 रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीमध्ये मा.औद्योगिक न्यायालयाने जैसे थे आदेश पारित केला असून, सद्यस्थितीत ते मा.औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानुसार सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. श्री.जगदिश लक्ष्मण पाटील यांनी मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे दाखल केलेल्या याचिकेतील अद्यापपर्यंत अंतिम निर्णय पारित झालेला नाही. त्यामुळे श्री. जगदिश पाटील यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देणेसाठी सद्यस्थितीत विचार करता येणार नाही.
- त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गाची 08 रिक्त पदे पदोन्नतीने भरावयाची असल्यामुळे खालील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. त्यामुळे रिक्त पदावर खालील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी यांना मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन व मा. महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1. | श्री.दिलीप रणवरे | |
| 2. | श्री.धनंजय वसंत कनोजे | |
| 3. | श्री.प्रकाश शंकर बोराडे | |

## विभागीय पदोन्नती निवड समितीचा निर्णय :-

**सदर प्रस्तावाचे वाचन करुन समितीने खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन परिशिष्ट "अ" मधील खालील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-क) यांना अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर पदोन्नती देणेकरीता निर्णय घेण्यात आला.**

1. विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांपैकी श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 नुसार अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. परंतू श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल यांना जा.क्र.मनपा/आस्था/824/2010-11, दि.16/10/2010 रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (सब स्टेशन ऑफिसर) या पदावर अनुसचित जाती या प्रवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. परंतू श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल यांनी अनुसूचित जाती या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले नाही. त्यामुळे श्री.छोटुलाल सुवाजी आदिवाल यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देणेकरीता अपात्र ठरविण्यात येत आहे.
2. विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांना विधी अधिकारी यांनी दि.21/03/2022 रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार सदर अधिकाऱ्यांच्या बाबतीत मा. उच्च न्यायालयाच्या पारित होणाऱ्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेणे योग्य होईल असे मत असल्याने सद्यस्थितीत सदर अधिकाऱ्यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देणेकरीता अपात्र ठरविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1. | श्री.अल्पेश जगन्नाथ संखे | |
| 2. | श्री. डॉसन आबेल ढोल्या | |
| 3. | श्री. सदानंद विष्णू पाटील | |

3. विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांपैकी श्री.जगदिश पाटील यांना जा.क्र.मनपा/आस्था/1918/3354/2013-14, दि.01/03/2014 रोजीच्या आदेशान्वये सब स्टेशन या पदावरुन पदावनत करुन पदोन्नतीपुर्वी कार्यरत यंत्रचालक पदावर पदस्थापना करण्यात आलेली आहे. श्री.जगदिश लक्ष्मण पाटील यांनी पदावनत आदेशाविरुध्द मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे याचिका क्र.81/2014 अन्वये दावा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले असुन मा.औद्योगिक न्यायालयाने अंतिम निर्णय पारीत केलेला नाही. त्यामुळे श्री.जगदिश पाटील यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देणेकरीता अपात्र ठरविण्यात येत आहे.
4. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाची 08 रिक्त पदे पदोन्नतीने भरावयाची असल्यामुळे खालील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. त्यामुळे 08 रिक्त पदावर खालील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या

पदावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1. | श्री.दिलीप रणवरे | |
| 2. | श्री.धनंजय वसंत कनोजे | |
| 3. | श्री.प्रकाश शंकर बोराडे | |

5. सदर पदोन्नती मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
6. अ.क्र.01 व 03 वरील अधिकारी यांना शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.
7. सदर अधिकारी यांची शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे पडताळणीच्या तसेच सेवा व वेतन पडताळणीच्या अधिन राहुन लाभ मंजुर करण्यात येत आहे. वेतन निश्चितीनंतर वेतन पडताळणी पथकाकडुन त्याची पडताळणी करुन घेणेत यावी.
8. सदर अधिकाऱ्याला पदोन्नतीच्या अटीशर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे,
9. कोणत्याही मा.न्यायालयाचा निर्णय संबंधीत अधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.
10. सदर अधिकाऱ्यांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत पदोन्नती समिती शिफारस करीत आहे.

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिपक खांबीत)
कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय
प्रतिनिधी
विभागीय पदोन्नती निवड समिती

(मंजिरी डिमेलो)
प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा अध्यक्ष
विभागीय पदोन्नती निवड समिती

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

जा.क्र.मनपा/आस्था/180 /2022-23 दि. 26/04/2022

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर कार्यरत अधिकारी यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :-
1. जा.क्र.मनपा/सा.प्र./1489/2015, दि.16/12/2015 रोजीचा आदेश.
2. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019.
3. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक -मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28/05/2019.
4. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही 2018/प्र.क्र.159/कार्यासन 12, दि. 01/08/2019.
5. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे 2021.
6. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक -मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25/11/2021.
7. मा. विभागीय पदोन्नती निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत दि.09/03/2022.
8. मा. विभागीय पदोन्नती निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत दि.31/03/2022.

**आदेश**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गातील अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबत संदर्भ क्र.08 नुसार पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.02 ते 06 वरील शासन निर्णयास अनुसरुन सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गातील खालील अधिकारी यांना सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीशर्तीच्या अधिन राहून आदेशाच्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.दिलीप रणवरे S-13 35400-112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 2. | श्री.धनंजय वसंत कनोजे S-13 35400-112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 3. | श्री.प्रकाश शंकर बोराडे S-13 35400-112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |

अटीशर्ती :-

1. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक 28306/2017 तसेच दि.07/05/2021 च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुबंई येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.
2. सदर पदोन्नती मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
3. अ.क्र.01 व 03 वरील अधिकारी यांना शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.
4. पदोन्नत अधिकाऱ्याने पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-

2015/प्र.क्र.303/कार्या-12, दि.12/09/2016 मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

5. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमीतपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.

6. सद्य:स्थितीत सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन पदोन्नती देण्यात येत आहे.

7. अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावरील पदोन्नती ही त्यांच्या विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

8. उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश प्राप्त होताच 07 दिवसात अथवा निम्नस्वाक्षरीत मंजूर करतील अशा वाढीव मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर व्हावे. तसेच पदभार स्विकारुन त्याबाबतचा अहवाल प्रशासनास तात्काळ सादर करावा. त्याचप्रमाणे विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर न झाल्यास अथवा पदोन्नती न स्विकारल्यास पदोन्नती आपोआप रद्द होईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही-1087/1131/प्र.क्र.11-89/बारा, दि.30 एप्रिल, 1991 मधील तरतुदीनुसार त्यांचे नाव निवड यादीतून काढून टाकण्यात येईल.

9. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांनी पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 11(1)(ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील नियम 13(अ)(1)(2)(ब) (1 व 2) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात येईल.

10. यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/परिपत्रक/आदेश/कायदा/मा.न्यायालयीन आदेश/नियमातील सुधारणा इत्यादीमुळे आवश्यक असतील त्याबाबतीत सदर आदेश रद्द करणे/सुधारीत आदेश काढणे याबाबतचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्त्व

1. अतिरिक्त आयुक्त (1/2)
2. उपायुक्त (सर्व)
3. मुख्यलेखापरीक्षक
4. मुख्यलेखाधिकारी
5. संबंधीत विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख
6. संबंधितांस
7. आस्थापना निवडनस्ती